नियमित दिवाणी <u>दावा क्र. २०९/२०२०</u>
अर्जुन दातिर वि. विठ्ठल दातिर.
<u>नि. क्रमांकः १८ खाली</u>

<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.१ अर्जुन धोंडिबा दातिर यांचा उलटतपास प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे त्यांचे सुविद्य विधीज्ञ श्री. एस. बी. गर्जे यांच्या मार्फत–</u>

१. गट क्र.१२७/४ मधील खातेदारांची नावे मी सांगु शकतो. सदर खातेदारांची नावे मंजाबा आश्रुबा दातिर, लक्ष्मण आश्रुबा दातिर, देविदास आश्रुबा दातिर, अन्नासाहेब आश्रुबा दातिर, आंबादास भाऊ दातिर, गंगाधर भाऊ दातिर, लहानु भाऊ दातिर अशी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येकाच्या वाटयाला किती क्षेत्र आले आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला गट क्र.१२७/१ च्या कोणत्या बाजुला गट क्र.१२७/४ आहे हे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला गट क्र.१२७/१ च्या कोणत्या बाजुला गट क्र.१२७/२ आहे हे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.३ ते १३ यांची मिळकत किती व कोणत्या बाजुला आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.१२७ चे एकुण १२७/१ ते १२७/४ असे गट तयार झाले असल्याबाबत व फाळणी झाली असल्याबाबत अभिलेख उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी न्यायालयात दावा दाखल करुन वाटप करुन घेतलेले नाही.

२. विठ्ठल दातिर व लक्ष्मण दातिर यांची जमीन माझ्या मिळकतीच्या पश्चिमेला आहे. सरकारी रस्ता माझ्या जमिनीमधुन गेलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या जमिनीतुन उत्तर दक्षिण रस्ता गेल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी–२९ कडील नकाशा मला मान्य नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दाव्यात नमुद केलेल्या चतुर्सिमा चुकीच्या आहेत. मी दावा मिळकतीची मोजणी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ व २ चे ४० आर अतिक्रमण असल्याचे मी अंदाजे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेल्या दाव्यातील चतुर्सिमा व

मिळकतीचे वर्णन चुकीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये ४० आर अतिक्रमण केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकुर पुर्णपणे खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by SHIRISHKUMAR DIGAMBAR WAGHMARE
DN: c=IN, o=BOMBAY HIGH COURT, 2.5.4.20=27258b50725b8ad0f02b93c79864217287a311295d93b8bfdb3e0b1ef7505488, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6950294, postalCode=400001, st=Maharashtra, serialNumber=a141e942a1599350c9e218a76b562e7b4a7f83f2030ebfe78fa3c19c2f168be2, cn=SHIRISHKUMAR DIGAMBAR WAGHMARE
Date: 2025.11.03 17:52:01 +05'30'

दिनांकः ०३/११/२०२५.
पाथर्डी.

**(शिरीषकुमार दि. वाघमारे )**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पाथर्डी.**